Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

Original Article

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व दलित शाहिरी परंपरा

**डॉ. राजेंद्र रामनाथ गायकवाड**
मराठी विभाग, सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर
**Email:** rajendragaikwad522@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180235
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2(A)
Pp. 177-179
February - 2026

**Submitted:** 18 Jan. 2026
**Revised:** 28 Jan. 2026
**Accepted:** 13 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश***

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि दलित शाहिरी परंपरा हा लेख दलित समाजाच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक मुक्तीच्या प्रवासाचा आढावा घेतो. हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे शूद्र व अतिशूद्र समाजावर झालेल्या अन्यायाचे चित्रण प्रारंभी केले आहे. अस्पृश्यतेमुळे दलित समाज शिक्षण, धर्मज्ञान व सामाजिक सन्मानापासून वंचित राहिला.एकोणिसाव्या शतकात महात्मा ज्योतिराव फुले यांनी अस्पृश्य उद्धाराची चळवळ सुरू करून शिक्षण व सामाजिक जागृतीचे कार्य केले. पुढे राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी सुधारकांनी प्रयत्न केले; परंतु या चळवळीला व्यापक स्वरूप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली प्राप्त झाले.आंबेडकरांनी महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन, तसेच सामाजिक व राजकीय लढ्यांद्वारे दलित मुक्तीचा मार्ग उघडला. त्यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर आधारित समाजरचना मांडली. हिंदू समाजव्यवस्थेत मूलभूत बदल अशक्य असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी १९५६ मध्ये बौद्ध धर्म स्वीकारला. या धर्मांतरामुळे दलित समाजाला नवीन तत्त्वज्ञान, आत्मसन्मान आणि संघर्षाची दिशा मिळाली. आंबेडकरी चळवळीचा सांस्कृतिक पैलू म्हणून 'आंबेडकरी जलसा' आणि दलित शाहिरी परंपरा विकसित झाली. या माध्यमातून प्रबोधन, सामाजिक जागृती आणि आत्मभानाची निर्मिती झाली. अशा प्रकारे आंबेडकरांचे कार्य हे केवळ सामाजिक सुधारणा नव्हे, तर सांस्कृतिक आणि वैचारिक क्रांतीचे प्रतीक ठरते.*

***मुख्य शब्द :*** *डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दलित शाहिरी, अस्पृश्यता, आंबेडकरी जलसा, बौद्ध धर्म, सामाजिक समता, दलित मुक्ती चळवळ.*

## प्रास्ताविक

हिंदू धर्म शास्त्राने सामाजिक रचना करताना चातुर्ण्यांचा पुरस्कार केला होता. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शूद्र. प्रत्येक वर्णनाला त्याची कार्य वाटून दिली गेली व या कार्यावरूनच वर्णावर्णातील श्रेष्ठ कनिष्ठता ठरवली गेली. वरच्या तीनही वर्णांना स्वतंत्र कार्यक्षेत्र होती. पण चौथ्या शूद्र वर्णाला स्वतंत्र कार्यक्षेत्र नव्हते. त्याने उपरोक्त त्रैवारणिकांची सेवा करायची. साहजिकच सेवकाकडे येतो तो कनिष्ठ पणा या वर्णाच्या वाट्याला आला. या शूद्र वर्णातही अतिशूद्रांचा एक वर्ग केला गेला. त्याला अस्पृश्य ठरविण्यात आले. तत्कालीन प्रस्थापित समाज व्यवस्थेला पडेल ती घायल्डी कामे कायमचा सेवक वर्ग हवा होता. तो एका विशिष्ट समाज गटाची उदरनिर्वाहाची सर्व साधने हिरावून घेऊन निर्माण केला गेला. घाणेरडी कामे करतो म्हणून हा वर्ग अस्पृश्य ठरवला गेला. व त्याला वस्तीसाठी गाव कसा बाहेरची जागा दिली गेली. उदरनिर्वाहासाठी गावावर अवलंबून असलेला हा समाज गावाचा कायमचा गुलाम बनला.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. राजेंद्र रामनाथ गायकवाड, मराठी विभाग, सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर*

**How to cite this article:**
*गायकवाड, . राजेंद्र . रामनाथ . (2026). डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व दलित शाहिरी परंपरा. Journal of Research & Development, 18(2(A)), 177–179. https://doi.org/10.5281/zenodo.18937194*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18937194

त्याने असेच कायमचे गुलाम राहावे. म्हणून मग त्याला धर्म ज्ञानापासून, व्यवहार ज्ञानापासून, शिक्षणापासून मुद्दाम वंचित ठेवले गेले. अज्ञानाच्या अंधकारात हा समाज वर्षानुवर्षे खितपत पडला. धर्माच्या बेवडी तत्त्वज्ञानाने त्याच्यावर मुलांमा चढवला. ज्या जातीत, ज्या वर्णन तुम्ही जन्माला आला असाल, त्याच धर्मात तुमचा उद्धार होणार आहे. परधर्म भयावह आहे. त्यामुळे आपली चाकरी सोडायची नाही, अशा प्रकारचं स्थितीवादी विचार या समाजाच्या माथी मारला गेला. शिक्षणाच्या ज्ञानाच्या अभावामुळे या समाजाने हा विचार स्वीकारला व वर्षानुवर्षे गाव कसा बाहेरच्या जगण्याला रुकार दिला. जनावरं पेक्षाही हिन पातळीवरचे जीवन वाटेला आलेला हा समाज शतकानूशतके मुक राहिला.

आधुनिक कालखंडात इ. स. 1820 नंतर मात्र इंग्रजी राजवटीच्या परिचयाने, आपल्याकडे आलेल्या आधुनिक व्यवस्थेने इथल्या समाज मनाचा मनोज पालटला. समाजातले अदस्तरही हळूहळू जागी होऊ लागली. 19 व्या शतकाच्या मध्यवर्ती महात्मा ज्योतिराव फुले यांनी पहिल्यांदा अस्पृश्य उद्धाराची कीर्ती मिळवली. अस्पृश्यांना पाणी मिळावे म्हणून घरातील विहीर त्यांनी खुली केली. तशी त्यांच्यासाठी शाळा काढून ज्ञानाची कवडे खुली केली गेली. महात्मा ज्योतिराव फुले यांनी अस्पृश्यतेची मीमांसा मांडताना, भटजींचे राजकारण उघडे पाडली. शेटजी आणि भरजींनी एकूण बहुजन समाजाला कसे नागवले आहे, हे त्यांनी स्पष्टपणे मांडले. भडजींच्या दातातून सुटण्याचा मार्ग म्हणून त्यांनी सार्वजनिक सत्यधर्म सांगितला. पुढे मात्र त्यांच्या या सत्यशोधकीत चळवळीला ब्राह्मण, ब्राह्मणी तर वादाचा रंग चढला. त्यात अस्पृश्यतेचा प्रश्न काहीसा बाजूला पडला गेला. महात्मा फुले नंतर राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, वि दा सावरकर यांनी अस्पृश्य उद्धारासाठी प्रयत्न केलेली दिसतात. पण त्यांच्या प्रयत्नांना चळवळीचे रूप मात्र लाभू शकले नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन कार्य** :-डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः दलित जाती जन्मलेले, अस्पृश्यता जवळून अनुभवलेले आणि आधुनिक शिक्षणाच्या दृष्टीने अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे बघणारे विद्वान कार्यकर्ते होते. बाबासाहेबांनी समाजशास्त्राचा अभ्यास करताना अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा मुळापासून शोध घेतला. लेखणी आणि करणी या दोन्ही दृष्टीने बाबासाहेब दलितांचे खरे खरे कैवारी ठरले. त्यांनी 1927 ला महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करून आणि मनुस्मृतीचे दहन करून,दलितमुक्तीलढ्याचे रणशिंग फुंकले.या घटनेपासून खऱ्या अर्थाने दलित मुक्तीलढ्याला प्रारंभ झाला. बाबासाहेबांचे दलित उद्धराचे कार्य सर्व परिचित असल्याने त्यांच्या कार्याचा येथे सविस्तर परामर्श घेण्याचे कारण नाही. बाबासाहेबांनी उभे केलेले लढे त्याचप्रमाणे आपल्या पत्रकारितेतून ग्रंथ लेखनातून त्यांनी केलेली अस्पृश्यतेची मीमांसा, मांडलेलं नवा मानवतावादी विचार या सर्वातून दलित मुक्ती चळवळ उभी राहिली. स्वातंत्र्य आंदोलनाच्या ऐन धामधुमीच्या काळात या चळवळीने जोर धरला. बाबासाहेबांना दलितमुक्ती हवी होती,म्हणजे नेमके काय हवे होते, हे सांगताना म. भि चिटणीस म्हणतात, " ब्राह्मण म्हणजे व्यवसायस्वातंत्र्य, बुद्धीस्वातंत्र्य, सामाजिक समता, लोक संग्राहक बंधुभाव आणि सामाजिक न्याय यांचा निषेध. असे बाबासाहेबांचे निश्चित मत असल्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेली हिंदू समाजाची पुनर्घटना ही ब्राह्मण विरहीत अशी होती. हिंदू समाज व्यवस्थेचे एकसंध पुनर्गठन हिंदूंनी काळाची पावले ओळखल्यास शक्य आहे, असा 1960 पर्यंत तरी बाबासाहेबांचा विश्वास असावा असे दिसते.नाहीतर अस्पृश्यांचे हीत साधने म्हणजे अखिल हिंदू समाजाचे हीत साधने, अस्पृश्योद्धार म्हणजे राष्ट्रोद्धार , मी प्रोटेस्टंट हिंदू आहे, असे विचार त्या काळात त्यांनी व्यक्त केले नसते नसते. बाबासाहेबांची हिंदू समाज सुधारण्याची भूमिका समकालीन सुधारकांपेक्षा वेगळी होती. बहुसंख्य समाज सुधारकांना उच्चवर्णीय हिंदूंच्या कौटुंबिक सुधारणा म्हणजे, सामाजिक सुधारणा असे वाटत होते. जाती नष्ट करण्याच्या चळवळीची त्यांना आवश्यकता वाटली नाही. किंवा त्यांनी तसे धाडस केले नाही. बाबासाहेबांची सामाजिक समतेची मागणी केवळ सैद्धातिक पातळीवरची असती.तर हिंदूंचा त्याला विरोध नव्हता.उदात्त तत्त्वे अध्यात्माच्या पातळीवर मान्य करायची, परंतु व्यवहाराच्या क्षेत्रात ती वर्ज्य मानायची ही आत्मवंचक परंपरा ब्राह्मणी संस्कृतीत औपनिषदिक काळापासून रूढ आहे. जातिवर्णाधिष्टीत विषमता हाच ब्राह्मणी परंपरेचा आदर्श वाटते. त्या समाजात परिवर्तन आणि गतिमानता ही असाध्य आहे. असा अनुभव येऊ लागल्यावर, बाबासाहेबांनी युगानुयुगांच्या पतितांना आत्मोद्धाराचा आदर्श पुरविल आणि तो व्यवहारात उतरवण्यासारखी परिस्थिती निर्माण करील अशी हिंदू समाजाची पुनर्घटना करण्याची आशा सोडली. परंतु मानवी जीवन सुसंस्कृत करायला धर्माची आवश्यकता आहे. अशी त्यांची श्रद्धा असल्यामुळे कायद्यातील संरक्षक तरतुदी आणि समाजवादी अर्थरचना या समाज नियंत्रक अन्य साधनावर केवळ विसंबून न राहता ते ब्राह्मणी धर्माला आणि पर्याय शोधू लागले. अभिनव सामाजिक उपक्रम स्वदेशीय परंपरेचा आधार लाभला तर तो राष्ट्रीय जीवनात उत्पादन घडविता समाजाला स्वीकार्य होण्याचा संभव आहे. हे बाबासाहेबांमधील समाजशास्त्रज्ञ त्यांना सांगत होता. तर आपल्या विधानाच्या समर्थनार्थ पूर्वापर प्रिन्सिडंट शोधणारा त्यांच्यामधील

कायदेपंडित स्वतंत्र सिद्धांत प्रस्थापित करण्याऐवजी एका प्राचीन परंपरेत, आधुनिक काळात समुचित असा नवा असे धुंडाळण्यास प्रवर्तक करीत होता. त्यांच्यामधील सामाजिक नितीशास्त्रज्ञाला ज्यात अखिल मानव जातीला परस्परसंबंधात समान सदाचार विहित आहे. ब्राह्मणी धर्मातल्या प्रमाणे वर्णानुसार भिन्न भिन्न सदाचार नाहीत. आणि ज्यात नीती म्हणजे समभावासारख्या उदात्त तत्त्वांचे विवेक बुद्धीला अनुसरून केलेली आचरण आहे., केवळ श्रुती स्मृती पुराणांनी घालून दिलेल्या निर्बंधाचे यंत्रवत पालन नाही. असा सामाजिक धर्म हवा होता. या बुद्धिवादी दलित विमोचकाला दुःख म्हणजे पिळवणूक नष्ट करून बहुजनांचे हित आणि सुख साधने हा ज्याचा आदर्श आहे, असा दैवी अधिष्ठान विरहित मानवतावादी धर्म पाहिजे होता. आणि तो या धर्मशोधकाला बुद्ध वचनात आढळला. “1( चिटणीस म. भि. दलित साहित्य :चर्चा आणि चिंतन, संपा. गंगाधर पानतावणे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. पहिली आवृत्ती 1993. पृ. 53-54.)

अस्पृश्यता निवरण्यासाठी इंग्रज राजवटी पासून बरेच प्रयत्न झाले. प्रयत्न करूनही अस्पृश्य म्हणून गणला जाणारा समाज स्वतंत्र झाला नाही. अस्पृश्यांचा प्रश्न हा हिंदू समाजातील परिवर्तनाशिवाय, मूलभूत बदल्या शिवाय सुटणारा नव्हता. अस्पृश्यता माननीय सामाजिक नीतीच्या दृष्टीने गुन्हा आहे,मानवी मनाची ही फार मोठी मानखंडना आहे. याची जाणीव हिंदू समाजाला करून देण्यासाठी बाबासाहेब अहोरात्र झटले – झगडले. परंतु त्यांच्या पदरी निराशाच पडली. 1935 सालापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली 1956 सालापर्यंत त्यांनी हिंदू समाजातील सर्व स्तरातून राजकीय,सामाजिक व कायदेशीरदृष्ट्या प्रयत्न करून पाहिल. परंतु हिंदू जाती व त्यांचा अस्पृश्यांच्या बाबतीतील हिनभाव वाढतच गेला. शेवटी 1956 ला बाबासाहेबांनी धर्मांतर केले.

1956 ला झालेले हे धर्मांतर दलितांसाठी नव्या युगाची सुरुवात ठरले. जगण्यासाठीचे,स्वतःचा उत्कर्ष करून घेण्यासाठीची घेण्यासाठीचे तत्त्वज्ञान बुद्ध धर्माने दलितांना दिले. “मानवाच्या विकासास अत्यावश्यक असलेली स स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय आणि अहिंसा ही मूलभूत तत्वे वैयक्तिक व सामाजिक जीवनात बाबासाहेबप्रणित बुद्ध धम्मानी स्वीकारलेली आहेत. दुःख निरोधासाठी माणसा माणसा मधील संबंध नीती तत्त्वानुसार नियंत्रित करणारा सदाचार हा बुद्ध धर्माचा गाभा आहे. बहुजन हित आणि बहुजन सुख साधने हा त्याचा उद्देश आहे. ज्ञानार्जनाचा अधिकार ब्राह्मणापासून भंग्यापर्यंत सर्वांना मुक्त आहे. वर्णपेक्षा शिलाला महत्त्व आहे. अध्यात्मिकदृष्ट्या जीवमात्रातील समता, आणि सामाजिक क्षेत्रात वर्ण जात्यानुसार विषमता अशी ब्राह्मणी धर्माप्रमाणे तत्व आणि व्यवहार यांची फारकत बुद्ध धम्मात नाही. “2 अशा बुद्ध धम्माचे तत्त्वज्ञान दलितांना मिळाल्यामुळे हिंदू धर्मातील अनेक तर्कदुष्ट प्रथा, परंपरा,समजुतींना त्यांनी नकार द्यायला सुरुवात केली. अन्यायी अत्याचारी धर्म तत्वाविरुद्ध विद्रोह पुकारला. त्यांनी शिक्षणाने कधी नव्हे ती प्रथमच वाचा लाभल्यामुळे स्वतःची वेदना शब्दबद्ध केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मंत्र शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा,’ दलित कार्यकर्त्यांनी शिरोधार्य मानला. दलित मुक्तीलढ्याने जोर धरला. या दलित मुक्ती लढ्याचे सांस्कृतिक मूख म्हणून मग दलित शाहिरीची व साहित्याची निर्मिती होऊ लागली.

**आंबेडकरी जलसा:** “आंबेडकरी जलसा” ही आंबेडकरी चळवळीची एक सांस्कृतिक उपलधी आहे. जलशामध्ये मनोरंजनापेक्षा प्रबोधनावर अधिक भर दिलेला असतो. आंबेडकरी जलशाचा प्रेक्षक हा सामान्य, अस्पृश्य, दलित माणूस होता. अज्ञानाच्या, अडाणीपणाच्या अंध:कारात चाचपडणाऱ्या समाजाला जलाशामुळे विचारांच्या वाटा सापडत होत्या.

**संदर्भसूची**

1. चिटणीस म.भि.- दलित साहित्य:चर्चा आणि चिंतन, संपा. गंगाधर पानतावणे, साकेत प्रकाशन औरंगाबाद, पहिली आवृत्ती 1993. पृ. 53.54.
2. कीरवले कृष्णा – आंबेडकरी शाहिरी एक शोध नालंदा प्रकाशन, पुणे. 1992.पृ. 84.
3. किरवले कृष्णा – उनि. पृ. 44.